आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

२८ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आणखी एकच दिवस उरल्यानं उमेदवारांची लगबग, मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्र्यासह अनेकांची नामांकनं दाखल

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज गुजरातमधे करणार ४ हजार ९०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं लोकार्पण आणि भूमीपूजन

- दीपावलीच्या उत्साहाला आज वसुबारसेनं प्रारंभ

**आणि**

- गेल्या आठवड्याच्या घसरणीनंतर भारतीय शेअर बाजारांत जोरदार तेजी

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आज विविध उमेदवार आपापले अर्ज दाखल करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात भव्य रॅली काढली आणि कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून अर्ज दाखल केला. त्यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे, शिवसेना नेते प्रताप सरनाईक आणि उतर यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही बारामती मतदारसंघातून आज नामनिर्देशनपत्र दाखल केलं. बारामतीतून महाविकास आघाडीचे उमेदवार युगेंद्र पवार यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यावेळी उपस्थित होते.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघातून, तर विश्वजीत कदम यांनी पलूस कडेगावमधून अर्ज भरला. नुकतेच राष्ट्रवादी

काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले प्रताप चिखलीकर यांनीही आज लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला. खासदार नारायण राणे यांचे पुत्र निलेश राणे यांनी कुडाळमधून उमेदवारी अर्ज भरला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माहीमचे उमेदवार आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनीही आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. याशिवाय इतरही नेते अर्ज दाखल करत आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं काल उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली. यात गेवराईतून विजयसिंह पंडीत, फलटणला सचिन पाटील, निफाडमधून दिलीपकाका बनकर तर पारनेरमधून काशिनाथ दाते यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं येत्या निवडणुकीसाठी नऊ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. यामध्ये मोहोळमध्ये सिद्धी कदम, परळीत राजेसाहेब देशमुख, चिंचवडमध्ये राहुल कलाटे, भोसरीत अजित गव्हाणे, करंजा विधानसभेसाठी ज्ञायक पटणी, हिंगणघाटमध्ये अतुल वांदिले, हिंगणामध्ये रमेश बंग, अणुशक्तीनगरमध्ये फहाद अहमद, माझलगाव इथं मोहन जगताप आदींना उमेदवारी देण्यात आली आहे.

शिवसेनेनंही काल २० उमेदवारांची पुढची यादी जाहीर केली. यामध्ये वरळीमधून मिलिंद देवरा, पुरंदरमधून विजय शिवतारे, कुडाळमधून निलेश राणे, कोल्हापूर उत्तरमधून राजेश क्षीरसागर आणि दिंडोशीमधून संजय निरुपम यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

काँग्रेसतर्फे काल १४ उमेदवारांची पुढची यादी जाहीर करण्यात आली, यात पुणे कॅटॉनमेंटमधून रमेश बागवे, शिवाजीनगरमधून दत्तात्रय बहिरट तर पंढरपूरमधून भगीरथ भालके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अंधेरी पश्चिममधून या आधीच्या यादीत सचिन सावंत यांना उमेदवारी दिली होती. परंतु आता या जागेवर अशोक जाधव यांना काँग्रेसनं उमेदवारी दिली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे काल ३२ उमेदवारांची घोषणा करण्यात आली, आंबेगावमधून सुनील इंदोरे, नाशिक पूर्व मधून प्रसाद सानप यांना रिंगणात उतरवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यात वाहनांची कसून तपासणी सुरू आहे. भिवंडी पश्चिम येथे भरारी पथक व नारपोली पोलीस यांनी केलेल्या संयुक्त कारवाईत ३ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात चांदीच्या वस्तूंचा समावेश आहे. या वस्तूंची अधिकृत बिलं नसल्याने तो ताब्यात घेण्यात आला.

**<><><><><>**

आसामच्या ढोलाई, समगुरी, बेहाली, सिडली आणि बोंगाईगाव या पाच विधानसभा जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची छाननी सुरू आहे, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं. सत्ताधारी भाजपनं तीन जागांवर, तर यूपीपीएल आणि असम गण परिषदेनं प्रत्येकी एका जागेवर अर्ज दाखल केले आहेत. काँग्रेसनं पाचही जागांवर उमेदवार उभे केले आहेत. आप आणि बोडोलँड पीपल्स फ्रंटनं, अनुक्रमे दोन आणि एका जागेवर उमेदवार उभे केले आहेत.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्जांची छाननी सुरू आहे. एकंदर ८०५ उमेदवारांनी या टप्प्यात उमेदवारी अर्ज भरले आहेत. अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख ३० ऑक्टोबर आहे. १३ नोव्हेंबर रोजी या टप्प्यातल्या ४३ जागांसाठी मतदान होणार आहे. मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. दरम्यान, झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं आज उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री मोदी आजच्या गुजरात भेटीत सुमारे चार हजार ९०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांची पायाभरणी तसंच लोकार्पण करणार आहेत. धोळकिया प्रतिष्ठान तर्फे अमरेलीमधे दुधाला इथं विकसित करण्यात आलेल्या भारत माता सरोवराचं आणि इतर पाणीपुरवठा प्रकल्पांच  उद्घाटन, तसंच रस्ते, रेल्वे आणि पर्यटनविषयक प्रकल्पांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><>**

देशभरात दीपावलीच्या मंगलपर्वाला आज, गोवत्स द्वादशी म्हणजेच वसुबारसेपासून प्रारंभ झाला. आज, गायवासराची पूजा करून दिवाळीची सुरुवात होईल. येत्या

रविवारपर्यंत चालणाऱ्या या प्रकाशोत्सवानिमित्त महाराष्ट्रात सर्वत्र चैतन्याचं वातावरण आहे. मनोवेधक रोषणाईनं बाजारपेठा सजल्या आहेत. आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या या बरोबरच कपडे, दागिने खरेदीसाठी लगबग दिसून येत आहे.

**<><><><>**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यातल्या जनतेला धनत्रयोदशी तसंच दीपावलीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. आजच्या वसुबारस तसंच उद्या असणाऱ्या धनत्रयोदशीपासून सुरू होणारी दिवाळी आनंद, समृद्धी आणि सुख शांती घेऊन येवो, असं राधाकृष्णन यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

जागतिक पातळीवर सुरू असलेल्या अस्थिरतेमुळे गेले काही दिवस सुरू असलेल्या घसरणीनंतर आज भारतीय शेअर बाजारांमध्ये वाढ दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स सुमारे साडे पाचशे अंकांनी वाढून ८० हजाराच्या आसपास व्यवहार करतो आहे. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही सुमारे सव्वाशे अंकांची वाढ होऊन २४ हजार ३०० अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे.

**<><><><>**

सार्वजनिक जीवनातली सचोटी आणि भ्रष्टाचारमुक्त समाजाला चालना देण्यासाठी आजपासून देशभरात दक्षता सप्ताह पाळण्यात येत आहे. राष्ट्राच्या भरभराटीसाठी एकात्मतेची संस्कृती विकसित करणं ही या सप्ताहाची संकल्पना आहे. सुशासन तसंच प्रशासनात नैतिकता आणि पारदर्शकता आणण्यासाठी अधिक संवेदनशीलतेची गरज लक्षात घेऊन हा सप्ताह आयोजित केला आहे. विविध मंत्रालयं, विविध सरकारी विभाग, सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्या, बँका

आणि इतर संस्थामधले सरकारी अधिकारी आज प्रतीज्ञा घेणार आहेत. तसंच भ्रष्टाचारविरोधात जागृतीसाठी आठवडाभर विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. दरवर्षी भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीच्या आठवड्यात हा सप्ताह आयोजित केला जातो.

केंद्रीय दक्षता आयोगाचे आयुक्त प्रवीण कुमार श्रीवास्तव आणि दक्षता आयुक्त ए एस राजीव यांनी आयोगाच्या नवी दिल्लीतल्या मुख्यालयात अधिकाऱ्यांना तर आकाशवाणीच्या महासंचालक प्रग्या पलिवाल गौर यांनी दिल्लीतल्या आकाशवाणी भवन इथं अधिकाऱ्यांना शपथ दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आभासी पद्धतीनं ५१ हजाराहून अधिक युवकांना नियुक्तीपत्रं वितरीत करणार आहेत. देशात ४० ठिकाणी हे रोजगार मेळावे आयोजित केले जाणार आहेत. विविध केंद्रीय मंत्रालयं आणि विभागांमधे नव्यानं भर्ती झालेले कर्मचारीही या मेळाव्यांमधे सहभागी होणार आहेत.

१४०० हून अधिक इ लर्निंग अभ्यासक्रम असून त्यामुळे कर्मचाऱ्यांमधे आवश्यक ती कौशल्य सक्षमपणे विकसित होतील.

**<><><><><>**

राष्ट्रीय छात्र सेना, नेहरू युवा केंद्र संघटना, राष्ट्रीय सेवा योजना आणि भारत स्काउट्स आणि गाईड्सच्या दोन लाख ३७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना युवा आपदा मित्र योजनेंतर्गत प्रशिक्षण दिलं जाणार आहे. केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं ही माहिती दिली. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या २० व्या स्थापना दिनानिमित्त या योजनेचा प्रारंभ त्यांच्या हस्ते झाला, त्यांनंतर ते बोलत होते. या वर्षी जुलैमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दलाकडून ४७० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या युवा आपदा मित्र योजनेच्या प्रस्तावाला मंजुरी दिली होती, जी देशातील 315 सर्वाधिक आपत्ती-प्रवण जिल्ह्यांमध्ये लागू केली जाणार आहे.

<><><><><>

बँक घोटाळ्यात सक्तवसुली संचालनालयाने नागपूरच्या एका व्यावसायिकाची सुमारे ५०३ कोटी रुपये मूल्याच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. मेसर्स कॉर्पोरेट पॉवर लिमिटेड आणि त्यांच्या प्रवर्तकांच्या स्थावर आणि जंगम मालमत्ता महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड आणि आंध्रप्रदेशातल्या विविध ठिकाणाहून जप्त केल्या आहेत. त्यात बँकेतली रोकड, म्युच्युअल फंड, समभाग, भूखंड आणि कंपनी यांचा समावेश आहे. विविध बँकांना मिळून सुमारे चार हजार सात कोटी रुपयांना फसवल्याप्रकरणी ही कारवाई ईडीने केली आहे.

<><><><><>

बीड जिल्हा रुग्णालयात रक्ताचा तुटवडा भासत असून, नागरिकांनी रक्तदान करण्याचं आवाहन जिल्हा रुग्णालयाचे शल्य चिकित्सक अशोक थोरात यांनी केलं आहे. या रुग्णालयात आपत्कालीन अपघात विभाग, शस्त्रक्रिया विभाग, त्याचबरोबर जिल्हाभरातून हिमोफिलिया, थॅलेसिनियाचे काही बाल रुग्ण सुद्धा आहेत. त्यांना आठवड्याला किंवा पंधरा दिवसाला रक्त द्यावंच लागतं, त्यामुळे जिल्हा रुग्णालयात दररोज ४० ते ४५ रक्त पिशव्यांची आवश्यकता असते, असं थोरात यांनी सांगितलं.

<><><><><>

मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दीक्षांत समारंभ ७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता सर कावसजी जहांगीर सभागृहात होणार आहे. समारंभाच्या  अध्यक्षस्थानी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन  आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा.

अभय करंदीकर प्रमुख अतिथी असतील. परीक्षा आणि मूल्यपामन मंडळाच्या संचालक डॉ. पूजा रौंदळे यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**